# महात्मा जोतीराव फुले यांचा इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन व त्यातील स्त्रीचे स्थान

**प्रा.डॉ. सुनिल चवळे,** एन.जे.पटेल महाविद्यालय मोहाडी.

उत्पादन साधनाच्या मालकीच्या जोरावर ब्रिटिशांनी राजकीय सत्ता हस्तगत करण्याऐवजी शस्त्रांच्या जोरावर राजा—महाराजांचा पराभव करून ती हस्तगत केली. अशी त्यांची समज दिसते. ब्रिटिशांच्या आधी मुस्लिम राज्यकर्त्यांचे आक्रमण त्यांच्या आधी प्राचीन काळात आर्यांचे आक्रमण असे भारताच्या इतिहासाबाबतचे चित्र जोतीबांच्या डोळयासमोर होते. प्राचीन काळात मूळ भारतीय रहिवाशांमध्ये कुठल्याही प्रकारचे भेद नव्हते. फक्त या जनतेवर कल्याणकारी राजा असलेल्या बळी राजाचे राज्य होते. आर्याचे आक्रमण झाल्यावर त्यांनी या क्षत्रीयांमध्ये जातीभेद पाडले. निर्धाराने आणि अखेरच्या क्षणापर्यंत लढणा—या आर्य — ब्राम्हणांनी महा—अरी (महार) मांग इत्यादी म्हणून अस्पृश्य ठरवून सर्वात खालच्या जातीत गावाबाहेर ढकलले इतरांना शेतकरी व बलुतेदार केले. स्त्रियांना नव—यांच्या अधिकाराखाली गुलामगिरीत टाकले. या सर्वांवर शिरजोर म्हणून स्वार्थी धुर्त आर्य धर्माचा खोटा आधार सांगून श्रेष्ठ ब्राम्हण बनले. असा थोडक्यात जोतीरावांचा भारताच्या इतिहासाकडे बघण्याचा दृष्टिकोन होता. मॅक्सम्युलरच्या थेरी ऑफ आर्यन रेस या मताच्या आधारावर त्याची मांडणी दिसून येते [१]

शोषणाची प्रक्रिया लुट, चोरी, यापासून सुरू झाली व लुटांरूमध्ये व चोरांमध्ये स्त्रिया सहभागी नव्हत्या. त्या नेहमीच लुटीच्या बळी होत्या. अशी साधारणपणे जोतीबांची भावना होती. सार्वजनिक सत्य धर्म व त्यांच्या पुस्तकात दृष्टाचरण या विषयावर लिहितांना त्यांच्या हाविचार स्पष्ट होतो. ते म्हणतात की, दुष्टाचरण हे माणसाच्या आळशीपणापासून सुरू झाले. काही माणसांना मेहनत व कष्ट करून जगण्यापेक्षा चोरी करून जगणं बंर वाटू लागले. पण या शस्त्र घेणा—या चोरांमध्ये स्त्रिया नव्हत्या असे त्यांनी स्पष्टपणे मांडले आहे.[२] अशी लुटीची प्रक्रिया केवळ भारतातच नव्हे तर सगळीकडे कशी झाली हे मांडतांना जोतीबांनी अत्यंत विदारक चित्र उभे केले आहे.[३]

जोतीबांच्या लेखनात स्त्रियांची गुलामगिरी लुटीच्या व्यवस्थेच्या सुरूवातीपासून होती आणि या व्यवस्थेशी संबंधीत रितीने तिचा उगम झाला अशी समज दिसते. स्वा—या, लुटालुट हे प्रकार सुरू झाले. लुटांरूमध्ये स्त्रिया नव्हत्या आणि जेव्हा जिंकणा—या पुरूषांनी मुळ पराभूत लोकांना दास म्हणून ठेवण्यासाठी धर्मग्रंथ लिहायला सुरूवात केली तेव्हा त्यांनी त्यांच्यापैकी स्त्रियांना आणखी दुययम स्थान ठरवून दिले. पुरूष व ब्राम्हणांची सेवा करायला सांगितले. ब्राम्हणांचा सर्वाधिकार आणि पतिव्रत्याच्या नावाखाली कुटूंबप्रमुखांचा सर्वाधिकार या जोडगोळीला प्रस्थापित केले. त्यामुळे शोषण करणा—या ब्राम्हणांच्या घरी आणि ज्यांचे शोषण होते. अशा शुद्र — अतिशूद्रांच्या घरी अशा दोन्ही बाजूला स्त्रियांची दडपणूक सुरू झाली. अशा प्रकारे या विषयी जोतीबांनी स्वत:चा दृष्टिकोन मांडला आहे. वरील दृष्टिकोन बेला फेल्ड ॲप्रोचकडे घेवून जाणारा आहे.

मार्कंड पुराणात अशा काही गावाचे वर्णन येते की ज्या गावात दृष्ट व शक्तीशाली लोक राहत असत व त्यांची स्वताची शेतीवाडी नसे ते इतरांच्या शेतीवाडीवर जगत अशाप्रकारची गावेच पुढे नगरे म्हणून विकसीत झाली. त्यांच्या द्वारे शेती कधीच केली जात नसे.[४] बाणभटटाच्या हर्षचरित मध्ये अशा सरंजामदार, जमीनदारांचे विस्ताराने उल्लेख आलेला आहे.[५] स्वतंत्र पूर्व काळात वसाहत वादी, साम्राज्य वादी धोरण नैतिक अधिष्ठान देण्यामध्ये वसाहतवादी इतिहासाचा बराच मोठा वाटा आहे. या वसाहतवादी इतिहास लेखनात भारतातील स्त्रियांचे दयनीय सामाजिक स्थान अधोरेखित केले गेले. जेम्स मिलने युरोपीय वर्गीय समाजाच्या आकलनातून भारतीय स्त्रियांच्या दयनीय स्थितीशी तुलना

तत्कालीन ब्रिटिश स्त्रियांच्या उच्च सामाजिक दर्जाशी केली. या मांडणीला प्रत्युत्तर देतांना हिंदू ब्राम्हणी राष्टवाद्यांसी आर्य स्त्रीची प्रतिमा पुढे करून प्राचीन हिंदू संस्कृतीत स्त्रियांना असलेल्या उच्च स्थानाचा गैरव केला. या काळात वैदिक संस्कृतीमधील स्त्रियांच्या सुवर्णयुगासंबंधीचे निबंध अनेक राष्टवादी इतिहासकारांनी लिहीले ब्राम्हणी मध्यम वर्गीय संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृति असे समीकरण मांडण्यात आले. ए. एस. आळतेकरासारख्या इतिहासकारांनी अभिजन स्त्रीचे हरविलेले स्थान पुन्हा स्थिर करण्याच्या उद्देशाने लेखन केल्याचे दिसते. आर.सी.दत्त यांनी मुस्लिम काळ हा हिंदु स्त्रियांच्या अवनतीचा मध्य बिंदू मानला. स्वातंत्रोत्तर काळातही इतिहास लेखन शास्त्रातील हेच प्रवाह प्रबळ पणे पुढे आल्याचे दिसते. भारतीय राष्ट्रिय चळवळ पितृसत्ताक राहिल्याने राष्ट्रवाद्याच्याही जाणीवा अभिजन असल्याने प्राचीन इतिहासाचा शोध घेतांना स्त्रियांचे दैवी आदर्श भारतीय स्त्री म्हणून गौरवीकरण करण्यातच त्यांनी धन्यता मानली, राष्ट्रवादी इतिहासकार याच पार्श्वभूमीवर अभिजन स्त्रीकेंद्री मांडणी करत होते. स्त्रियांच्या कुटूंबातील स्थानाला महत्व देण्यात आले व हे विश्लेषन उच्चवर्णिय, उच्च वर्गीय कुटूंबापुरतेच राहिल्याचे दिसते. १९५०—६० च्या दशका मध्ये ऐतिहासिक भौतिकवादी विश्लेषण पध्दतीचा अवलंब डाव्या विचारवतांनी पुढे आणला परंतू सुमित सरकार यांनी निदर्शनास आणल्या प्रमाणे या इतिहास लेखनामध्येही राजकीय व आर्थिक क्षेत्रावर लक्ष केंद्रीत केले व सामाजिक क्षेत्र दुर्लक्षित राहीले, कामगार व कृषक चळवळींचे इतिहास लिहितांना सामाजिक व सांस्कृतिक घटकांकडे दुर्लक्ष केले गेले. आर.एस. शर्मा च्या इतिहास स्त्रिया व शूद्राचे समिकरण या बाबतीत भाष्य केलेले आढळते पण त्यांच्या विश्लेषण चौकटीत याचा संदर्भ घेतला जात नाही. डी.डी.कोसंबी व रोमीला थापर यांच्या इतिहास लेखणाच्या बाबतीतही हेच आढळून येते. जाती व्यवस्थेचा व पुरूष प्रधान व्यवस्थेचा भौतिक पाया नाकारण्याचा हा परिणाम असावा.[६]

उपरोक्त इतिहास लेखणाच्या प्रकाराला म. जोतीबा फुले यांनी शह दिल्याचे आढळते फुलेंनी इतिहासाची मांडनी अधिक तळाकडून करून वंचितवादी लेखन केले. उपेक्षित स्त्री प्रश्नाना अग्रकम दिला. लिंग भावाचा संघर्ष अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला. इतिहास लेखनातून अदृष्य असलेल्या स्त्रीला दृश्य स्वरूप दिले स्त्रियांवर झालेले अत्याचार केंद्रस्थानी आणले. स्त्रिया सदा सर्वकाळ शोषित आणि अत्याचार ग्रस्त नव्हत्या अशी मांडणी केली. कष्टकरी स्त्रियांची उत्पादन क्षेत्रातील कामगिरीचा इतिहासात नव्याने कोरण्याचा प्रयत्न केला. लिंगभाव जडण घडणीचा इतिहास दिला, एकंदरीत लिंगभावाची जडणघडण ही वंश, जात, लैगिकता या घटकानुसार बदलत असते या बाबतचे भान दिले. स्त्रियांच्या शोषणासंबंधीचा इतिहास मांडला. दुर्लक्षिलेल्या स्त्रियांच्या स्थानाचा शोध घेवून, चिकित्सा केली. पुरूषप्रधानता, पुरूषशाही, लिंग, लिंगभाव, जात या संकल्पनाची नव्याने मांडणी केली आणि स्त्रीवादाचे सम्यक स्वरूप पुढे आणले, दुर्लक्षित, अदृश्य, रूढीबध्द पारंपारिक इतिहास लेखनाची चिकीत्या केली.

संदर्भग्रंथ सुची :—

१) बागुल प्रभाकर, महामानव ज्योतीराव फुले एक अभ्यासपुर्ण चरित्रात्मक कादंबरी : ज्ञानदत्त प्रकाशन पुणे, २००२, पृ. ९९
२) फडके य.दि. महात्मा फुले समग्र वाडमय : प्रकाशक सचिव महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई २००६, पृ. १५१
३) उपरोक्त पृ. ३९२
४) शर्मा रामशरण, भारतीय सामंतवाद : दिल्ली, १९७४, पृ. २६
५) उपरोक्त पृ. ३०